# Good Work Of Nagpur Rural Police

## अनैतिक संबंधातील वादावरुन झालेला खुनाचा गुन्हा उघड

## स्थागुशा व सायबर सेल पथकाची यशस्वी  कामगिरी

दिनांक ०९/०२/२०१७ रोजी पोलीस स्टेशन उमरेड जिल्हा नागपूर ग्रामीण हद्दीतील मौजा धुरखेडा शिवारात श्री. रऊफ अनवर पटेल, वय ४५ वर्षे, रा. वार्ड क्र २२, उमरेड यांना एक ३० ते ३५ वर्षे वयोगटाच्या इसमाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दिसुन आल्याने त्यांनी यासंबंधी पोस्टे उमरेड येथे माहिती दिली. त्यावरुन पोस्टे उमरेड येथे मर्ग क्र ०५/१७ कलम १७४ जाफौ अन्वये दाखल करण्यांत आला. मृतक इसमाजवळ मिळालेल्या साहित्याच्या आधारे त्याच दिवशी त्याची ओळख पटविण्यात उमरेड पोलीसांना यश आले. सदर इसम हा मृतक नामे-सुरेन्द्र रामप्रसाद शनिचरे, वय २९ वर्षे, रा. तुमसर, जि. भंडारा येथील असल्याचे निष्पन्न झाले.

नागपूर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांनी सदर गुन्हयाचे समांतर तपास करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेल नागपूर ग्रामीण यांना तात्काळ दिले. मृतक नामे-  सुरेन्द्र शनिचरे हा राहत असलेल्या सोनेगाव शिवारात त्याच्यासंदर्भात अधिक सविस्तर माहिती गोळा करण्यात आली.  तसेच सायबर सेलमार्फतीने हायटेक तपास करण्यात येवून संशयीतांना विचारपूस करण्यात आली.  त्यात आरोपी नामे -१) शिशुपाल अशोक मेश्राम, वय २९ वर्षे, रा. गरोबा मैदान, नागपूर याचे मृतक सुरेन्द्र शनिचरे याच्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याची माहिती मिळाली.

यावरुन दिनांक १६/०२/२०१७ रोजी स्थागुशा व सायबर सेल पथकाचे सपोनि अरविंद सराफ, कर्मचारी स्टाफ बाबा केचे, अजय तिवारी, चेतन राउत, सत्यशिल कोठारे, साहेबराव बहाले, सचिन किनेकर, वर्षा खंडाईत यांनी संशईत आरोपी शिशुपाल अशोक मेश्राम यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता आरोपी क्र. १ याने त्याचा नोकर आरोपी क्र. २) मनोज बालाजी चौधरी,

वय २१ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, नागपूर याच्या मदतीने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली व सांगीतले की, मृतक सुरेन्द्र शनिचरे हयाच्या पत्नीशी शिशुपाल मेश्राम याचे अनैतिक संबंध असल्याची माहिती मृतकाला माहित झाल्याने तो त्याच्या पत्नीला नेहमी मारहाण करुन त्रास देवू लागला. तसेच त्याने त्याच्या पत्नीस माहेरी सोडुन दिल्यामुळे आरोपी शिशुपाल मेश्राम याने या गोष्टीचा राग मनात धरुन दिनांक ०३/०२/२०१७ रोजी मृतक सुरेन्द्र शनिचरे यास बहाण्याने बोलाविले आणि त्याला आपल्या मारुति अर्टिगा कारमध्ये बसवून बिअरमध्ये कोणतेतरी विषारी किटकनाशक मिसळविले. व ते बिअर समजुन पाजले तसेच त्याचा गळा दाबून त्यास जिवानिशी ठार मारले आणि त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने मौजा धुरखेडा ता. उमरेड येथील शेतशिवारात टाकुन दिला. बिअर बॉटेल, मृतकाची चप्पल, विषारी औषधाची बॉटल, मृतकाचा मोबाईल व सिमकार्ड तोडून प्लास्टिकच्या पिशवीमध्ये टाकुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने रस्त्याच्या कडेला असलेल्या एका शेतात फेकुन दिले. आरोपी शिशुपाल हा नेहमी क्राईम पेट्राल सिरियल पाहत होता आणि हा गुन्हा करण्याची संकल्पना ही त्याने या सिरीयलच्या माध्यमातुनच घेतली हे आरोपीने गुन्हा कबुल करतेवेळी तपास पथकाला सांगगिले. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास पोनि प्रकाश हाके हे करीत आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्या मार्गदशर्नाखाली उमरेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल जयस्वाल, स्था.गु. शाखेचे पोनि. श्री. संजय पुरंदरे, श्री प्रकाश हाके, सपोनि अरविंद सराफ आणि कर्मचारी बाबा केचे, अजय तिवारी, चेतन राउत, सत्यशिल कोठारे, साहेबराव बहाले, सचिन किनेकर, वर्षा खंडाईत यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस स्टेशन उमरेडचे ठाणेदार प्रकाश हाके आणि सायबर सेलचे सपोनि अरविंद सराफ

व स्थानिक गुन्हे शाखेचे  कर्मचारी अटक आरोपीसह